● शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७० वा ● किमंत २ रु. ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## राधाकृष्णजी महाराज यांच्या भागवत कथेस उद्यापासून सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील नवा मोंढा रोडवर ब्रजधामध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स प.



पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, शनिवारी बडी सडकवरील श्रीराम मंदिर ते कथास्थळापर्यंत भव्य शोभायात्रेने कथा महोत्सवाला सुरुवात होणार आहे. घोडेस्वार, उंटस्वार, शाहिरी, लेझीम, ढोल व दांडिया पथक, विविध झांकी, कलशधारी महिला, विविध रथ हे शोभा यात्रेचे आकर्षण राहणार आहे.

सहा वर्षानंतर जालना येथे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांची कथा होत असून, पंधरा हजार भाविक बसू शकतील, अशी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. दरोज दुपारी १ ते ५ या वेळेत कथा होणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता बडी सडकवरील श्रीराम मंदिरापासून शोभायात्रेला सुरुवात होणार आहे. बडीसडक, नरिमान रोड, बसस्टँड, राजुरी कॉर्नर, मुंडे चौक ते कथास्थळ ब्रजधाम असा शोभायात्रेचा मार्ग राहणार आहे. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी २५ स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत. शोभायात्रेत २० रथांसहउंट व घोडेस्वार, १०१ कलशधारी महिला, गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज विराजमान असलेला रथ, प्रसिद्ध लक्ष्मी व बालाजी ब्रॉस बँड, उल्हासनगरचा बेंजो बँड, केरळचे बँड पथक, आत्याधुनिक चाऊ साऊंड, पंजाबी ढोल पथक, मंगलमय वाद्य, ततडम ताशा, दांडिया पथक, बाल वारकरी दिंडी, लक्ष्मीकांतनगर येथील प्रयाग विद्यालयाचे लेझीम पथक, दांडिया व ढोल पथक, भजनी मंडळ, माहेश्वरी किशोरी मंडळाचा रथावरील राधा कृष्णाचा देखावा, माहेश्वरी सहेली सखी ग्रुपचा रामदरबार, प्रसिद्ध शाहीर आप्पासाहेब उगले यांचे शाहिरी पथक, विप्र समाजाचा भगवान परशुराम देखावा, सिंधी सम ाजाचा गोपी-कृष्ण देखावा, सकल मराठा समाजाचा विठ्ठल रुक्माई देखावा, लंमाणी सम ाज झांकी, भागवत कथा ग्रंथ रथ, अकोल्याची बजरंगबली झांकी या शोभायात्रेत राहणार आहे.

कथेच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध भागात प्रभात फ ेरी, १९ जानेवारीला रात्री ८ वाजता वृंदावन धामचे पूज्य इंद्रेशजी महाराज यांचा भजन महोत्सव, २२ जानेवारीला रात्री ८ वाजता निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या होणार आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून कथास्थळी दररोज म ाहेश्वरी युवा संघटनच्यावतीने व जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, जालना जनसेवा ग्रुप व विक्रम टी कंपनीतर्फे चहा तर सिंधी समाजातर्फे अल्पोपहार सेवा

> उंट, घोडेस्वार, कलशधारी, सजीव देखावे, शाहीरी पथक शोभायात्रेचे आकर्षण
> रक्तदान, चहा, अल्पोपहार आदी सेवाभावी उपक्रमांचे आयोजन
> भागवत कथेचे युट्युबवरून प्रक्षेपण
> १५ हजार भाविकांची बैठक व्यवस्था असलेल्या भव्य मंडपाची उभारणी

आदी सेवाभावी उपक्रम राबविले जाणार आहेत. युट्युबवरून भागवत कथेचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.

शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी होऊन भागवत कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

## खड्डेमय रस्ते व नागरी समस्येच्या मुद्द्यावर युवक काँग्रेस शुक्रवारी रास्ता रोको आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवावे आणि नागरी समस्यांचे निराकरण करावे; अन्यथा युवक काँग्रेसच्यावतीने २३ जानेवारी रोजी नूतन वसाहत उड्डाणपुलावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव शेषराव जाधव यांनी दिला आहे.

या संदर्भात आज गुरुवार दि. १६ जानेवारी रोजी शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत रत्नपारखे, सुरज छत्रे, दीपक गायकवाड, अनिल खिल्लारे, शेख मुस्ताक, दीपक इंगळे, भाऊसाहेब कुवारे, प्रभू दाभाडे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वाहतूक कोंडी, अपघात, आणि रस्त्यांची दुरवस्था ही या समस्येची मुख्य कारणे आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या समस्या अधिक पान २ वर



## सोशल मिडीया, वेबसिरीजवर चालणाऱ्या अश्लिल जाहिराती त्वरित बंद करा - अश्विनी धन्नावत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संस्कृतीतील नातेसंबंध व मूल्यांची जपणूक करण्यासह समाजातील विकृतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी बाल न्याय मंडळाच्या सदस्य ड. अश्विनी महेश धन्नावत यांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, त्यांनी सोशल मिडिया, वेबसिरीज आणि विविध प्सवर दिसणाऱ्या अश्लील जाहिरातींविरोधात आवाज उठवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे.



या निवेदनात ॲड. अश्विनी महेश धन्नावत यांनी भारतीय संस्कृतीतील नातेसंबंधांचे महत्त्व अधोरेखित केले असून, सासू-सुना, सासरे-सून, भाऊ-वहिनी यांसारख्या नात्यांमध्ये असणाऱ्या सन्मानाचा उल्लेख केला आहे. मात्र, सध्या सोशल मिडिया आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या नात्यांना दूषित करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा त्यांनी आरोप केला आहे. विशेषतः ट्रुकॉलर किंवा गुगल सर्चसारख्या प्लॅटफॉर्मवर अश्लील जाहिराती येत असल्यामुळे युवा पिढीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. ॲड. धन्नावत यांच्या पान २ वर

### युवा आदर्श

### शोध...

हरविते अकस्मात
वस्तु लाडकी कधी
आठवणी डोळ्यां
वहाया लागते नदी
हरवली असे कुठे
बोथट बनते बुध्दी
सांभाळली ना नीट
सतावे पश्चात बुध्दी
सारे काही नाशवंत
स्वताला लावे नादी
कसे असे वेंधळेपण
वाटू लागे अपराधी
सांगत फिरे सर्वांना
कधी न झाले आधी
कळले नाही जपावे
गोष्ट ही सरळ साधी
अमूक अमूक झाले
सर्वत्र दवंडी न् वर्दी
हळहळणारे कित्येक
साळसूद आधारगर्दी
अति तळमळ नसो
लागेल विचीत्र व्याधी
आपला बावळटपणा
लांबडी मिळेलं यादी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दुसऱ्या दिवशीही मनपाचा अतिक्रमणावर हतोडा

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगर पालिकेच्यावतीने शहरातील अतिक्रम णावर दुसऱ्या दिवशीही हतोडा म ारला आहे. गुरुवार (दि १६) रोजी मनपाने अठरा ते वीस अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण जमिनोध्वस्त केले. शहरातील भीमराज प्रवेशद्वार ते वाळकेश्वर मंदीर पर्यंत रहदारीस अडथळा निर्माण करणारे आरसीसी वॉल कंपाऊंड, आरसीसी दुकानांचे अतिक्रमण निष्कासित करण्यात आली.

हे अतिक्रमण काढण्याकरीता मनपाचे सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, इंजिनिअर सय्यद सऊद, स्वच्छता विभागाचे पंडीत पवार, सतीश पाचगे, अरुण वानखेडे, अशोक लोंढे, श्रावण सराटे, विलास गावंडे, निलेश शंकरपिल्ली, हरिष चांदोडे, शोएब खान, अविनाश सराटे आदींसह जालना महानगर पालिकेचे कर्मचारी-अधिकारी मेहनत घेत आहेत. पोलीस प्रशासनानेचही मनपाला प्रसंगी सहकार्य मिळत आहे. मनपाच्यावतीने अतिक्रमण मोहिम निरंतर सुरु राहणार असल्याचे सांगतांनाच स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

> मनपाच्यावतीने डीपी रोडवरील अतिक्रमण काढण्यात येत आहे. मात्र, गेल्या वर्षभरापासून आझाद मैदानावरील एका क्लासेसने केलेल्या अतिक्रमणाबाबत तक्रार दिल्यानंतरही हे अतिक्रमण काढण्यासाठी मनपाला अद्यापपर्यंत मुहूर्त सापडला नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दुसरीकडे तक्रारदाराने आझाद मैदानवरील अतिक्रमण काढण्यासाठी लोक आयुक्त यांच्याकडे देखील तक्रार केली आहे. मनपाच्या पाहणी अहवालात या ठिकाणी अतिक्रमण असल्याचे स्पष्ट झाले असल्यानंतरही मनपा प्रशासन का कारवाई करत नाही असा प्रश्न उपस्थित होतो आहे.



## लाडक्या बहिणीला चॉकलेट दाखवण्याच काम या राज्यसरकारने केले; खांडेभराड यांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने महिलांसाठी आर्थिक सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सुरू केलेली लाडकी बहीण योजनेच्या वाढीव रक्कम ेचा नव्या सरकारला विसर पडलाय. लाडकी बहीण योजनेच्या जोरावर निवडून आलेले राज्य सरकार सत्तेत येऊनही महिना उलटला तरी वाढीव रकमेबद्दल अजून शब्द सुद्धा बोलत नाही. विधानसभा निवडणुकीच्या पार्शवभूमीवर सरकारने लाडकी बहीण योजना आणून १५०० रुपये प्रति महिना महिलाच्या खात्यावर टाकले होते. सत्तेवर आल्यावर २१०० रुपये प्रति महिना महिलाच्या खात्यावर टाकल्याच आश्वासन दिले होते. परंतु याचा राज्य सरकारला विसर पडलाय असंच दिसतंय.



सरकारने लाडक्या बहिणीला विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी चॉकलेट दिले होते. आम्ही निवडणुकीत सरकारला मतदान करू यासाठी १५०० रुपये लाडक्या बहिणीच्या खात्यात टाकले होते. आणि सत्तेत आल्यावर २१०० रुपये खात्यात टाकू असं आश्वासन देखील त्यावेळी दिले होते. मात्र सतेत आल्यावर सरकारला त्यांचा विसर पडल्याचा आरोप जालन्यातील शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीच्या पान २ वर

## मराठा महासंघाचा शिक्षण विभागाला सात दिवसांचा अल्टिमेटम

### शासन निर्णयाची १०० टक्के अंमलबजावणी करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या मराठा महासंघाने जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. जालना जिल्हा परिषदेच्या मध्यामिक शिक्षण विभागाने सकाळी ७ ऐवजी ९ वाजता शाळा भरविण्याच्या शासन निर्णयाची १०० टक्के अंम लबजावणी न केल्याने त्यांना नोटीस पाठविण्यात आलीय. जालन्याच्या अनेक शाळा अजूनही सकाळी ९ वाजता भरविण्यात येत नसल्याने मराठा महासंघ आक्रमक झालाय. सध्या थंडीचा जोर चांगलाच वाढलाय. या वाढलेल्या थंडीमुळे सकाळी लवकर शाळेला गेल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्याम ुळे राज्यातील पहिले ते चौथी पर्यंतच्या शाळा सकाळी ७ ऐवजी ९ वाजता भरविण्याचे निर्देश राज्य सरकारने दिलेत. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी अद्याप पर्यंत जालन्यातील सगळ्या शाळांम ध्ये होत नाहिये. त्यामुळे मराठा महासंघाने जालना जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. पुढील ७ दिवसात शासन निर्णयाची १०० टक्के अंमलबजावणी न केल्यास न्यायालयात दाद पान २ वर



## संपादकीय

### महाराष्ट्राचा विवेकी आवाज

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गृहमंत्रालयाची कारवाई योग्य दिशेने !

## राज्यात वाल्मिक कराड सारखे हजारो गुन्हेगार असू शकतात!

संतोष देशमुखांचे ९ डिसेंबर २०२४ ला अपहरण झाले व नंतर त्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली व यानंतर चौकशीच्या माध्यमातून अनेक उलघडे सामोर आले.या कारवाई दरम्यान फरार आरोपींना पकडण्यात सुध्दा आले.यात वाल्मिक कराड सुध्दा फरार होता.परंतु वातावरण जास्तच चिघळत असल्याचे पाहून आपल्याला सपोर्टस करणारे राजकीय पुढारी फसु शकतात हे पाहून वाल्मिक कराड पोलिसांना शरण आला. त्यानंतर चौकशी दरम्यान पोलिस विभागाला सर्व आरोपी व वाल्मिक कराडपासुन नवीन-नवीन सुगावे लागत गेले.यावरून स्पष्ट झाले की वाल्मिक कराड सर्वसाधारण व्यक्ती नसून मोठा गुन्हेगार आहे.त्याच अनुषंगाने त्याच्यावर सीआयडीकडुन मकोका लावण्यात आला आहे. बीडच्या याप्रकरणाला एक महिन्यापेक्षा जास्त दिवस लोटुन गेले.तरीही तेथील संघर्ष अजूनही शांत झाला नाही.बीड मधील संतोष देशमुख हत्याप्रकरण संपूर्ण महाराष्ट्रासह देशात गाजत आहे.त्यामुळे बीडची परिस्थिती अतिसंवेदनशील आहे.यामुळे असे वाटत आहे की बीडमध्ये चाल्लय तरी काय! बीडच्या या हत्याकांडावरून असे लक्षात येते की याठीकाणी गुन्हेगारांना कोन्हीतरी मोठा नेता खत पाणी घालत असावेत तेव्हाच त्याठिकाणी एवढे मोठे गुन्हेगारांचे जाळे विणलेले दिसून येते. ही हत्या खंडणी प्रकरणातून झाली असल्याचे सांगितले जाते आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधाराची सुई वाल्मिक कराडवर जात आहे व आतापर्यंतच्या तपास यंत्रणेच्या माध्यमातून असे लक्षात येते की वाल्मिक कराड हा खंडणी वसूलीच्या बाबतीत मुख्य आरोपी असल्याचे दिसून येते.गुन्हा अन्वेषण विभाग (सीआयडी) यांनी सखोल चौकशी केली तेंव्हाच वाल्मिक कराडवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये (मकोका) चार आरोप ठेवण्यात आला.त्यामुळे संतोष देशमुख हत्येचा सूत्रधार मानण्यात येत असल्याने कराडच्या अडचणींत वाढ झाली आहे.त्यामुळे कराड समर्थक आंदोलन करतांना दिसत आहे. एकीकडे कराड समर्थक तर दुसरीकडे संतोष देशमुख हत्याप्रकरणाची चौकशी करण्याचे समर्थन करणारे अशा पध्दतीचे दोन गट निर्माण झाल्याने सरकारने बीड जिल्ह्यात २८ जानेवारीपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे जिल्हाभरात विविध संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांच्याकडून आंदोलन करण्यात येत आहे तर दुसरीकडे कराडवर मकोका लावल्याने त्यांचे समर्थक आगबबुला झाल्याने आंदोलन करीत आहे.यात संघर्ष निर्माण होवू नये म्हणून सरकारने जमावबंदीचे आदेश दिले आहेत ही सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण बाब आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत बीडमध्ये एकीकडे गुन्हेगारांचे समर्थक तर दुसरीकडे गुन्हेगारांचे विरोधक आमनेसामने आल्याचे दिसून येते. गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो त्याला माफी नकोच.पोलिस विभाग, सीआयडी विभाग व अन्य सुरक्षा विभागाचे वाल्मिक कराड बाबद सखोल चौकशी केल्यानंतरच त्यावर मकोका लावण्यात आला आहे ही बाब वाल्मिक कराडच्या समर्थकांनी लक्षात ठेवली पाहिजे व चौकशी करीता सरकारला व सुरक्षा विभागाला सहकार्य केले पाहिजे.कारण गुन्ह्याला माफी नकोच.मकोका लावल्यानंतर बीड न्यायालयाकडुन वाल्मिक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावण्यात आली आहे.यात आणखी अनेक उलघडे सामोर येवू शकतात.कारण ९ डिसेंबरला सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून संभाषण झाल्याचे सांगितले जाते यात त्या दिवशी नेमके काय बोलने झाले याचा तपास एसआयटी मार्फत होणार आहे.यावरून स्पष्ट होते की वाल्मिक कराड सर्वसाधारण गुन्हेगार नसुन याचे गुन्हेगारीचे मोठे जाळे असल्याचे सिद्ध होते.शेवटी गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो त्यामुळे सर्वांनीच पोलिस विभाग, सीआयडी विभाग व गृहविभागाला सहकार्य करने अत्यंत गरजेचे आहे.कारण बीडच्या या हत्याकांडाच्या प्रकरणावरून लक्षात येते की राज्यात हजारो वाल्मिक कराड राहु शकतात यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे अशा गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी सर्वांनीच पोलिस विभागाला सहकार्य करण्याची नितांत गरज आहे.कारण बलात्कार,खंडणी वसुली, हत्या करणे, धमकी देणे,वाळू माफिया व अन्य माफिया असे मोठ-मोठे गुन्हेगार आपल्याला राज्यात दिसून येतात. परंतु या गुन्हेगारांना एखाद्या मोठ्या राजकीय पुढाऱ्यांचा सपोर्ट अवश्य असतो तेंव्हाच तो गुन्हेगार खुलेआम गुन्हा करतांना दिसतात. त्यामुळे सरकारने व गृहविभागाने गुन्हेगारांवर कारवाई तर करावीच सोबत पडद्याच्या मागे असणाऱ्या मोठ्या माश्यांवर सुध्दा कठोर कारवाई व्हायला हवी. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## मंठा पंचायत समिती कार्यालयासमोर ग्रामसेवक मुख्यालयी असावा या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचे आंदोलन

**मंठा । प्रतिनिधी -** ग्रामसेवकांनी मुख्यालई व्यास्तव्यास राहणे बंधनकारक आहे या बाबतचे शासनाचे परिपत्रक असतांना तालुक्यातील ग्रामसेवक मुख्यालई राहत नसल्यामुळे तालुक्यातील ग्रामपंचायतिचा कारभार ढेपाळलेला असल्यामुळे सामान्य जनता त्रस्त आहे. या बाबत संभाजी गब्रिगेडच्या वतीने गटविकास अधिकऱ्यांना अनेक पत्रव्यवहार करूनही गटविकास अधिकाऱ्यांनी झोपेचं सोंग घेऊन कागदी घोडे नाचवल्याने संभाजी ब्रिगेडच्या वतीने पंचायत समिती कार्यालयासमोर १३जानेवारी रोजी धरणे आंदोलन करण्यात आले आहे.



सविस्तर वृत्त असे की संभाजी ब्रिगेडने गटविकास अधिकाऱ्यांना दि. ३१ डिसेंबर रोजी तालुक्यातील ग्राम सेवक मुख्यालई राहत नसून ग्रामसेकावर शिस्तभंगाची कारवाई करावी नसता आपल्या कार्यालयासमोर दि. १३ जानेवारी रोजी आंदोलन करण्यात येईल असा ईशारा निवेदनाद्वारे देण्यात आला होता.

संभाजी ब्रिगेडने गावोगावी जाऊन स्वाक्षरी मोहीम राबवली ग्रामसेवक मुख्यालयी वास्तव्यास नसल्याचे माहिती गोळा केली असुनही पंचायत समितीकडून कारवाई न करता फक्त कागदी घोडे नाचवल्याने संभाजी ब्रिगेडच्या वतीने आंदोलन करण्यात आले आहे.

## एक्स्प्रेस-वेवर कारची टेम्पोला धडक

**पनवेल । प्रतिनिधी -** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर रात्री अडीचच्या सुमारास टेम्पोला कारने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात तिघेजण जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आलीं.यातील पिकअप टेम्पो एम एच १४ केक्यू ९२४६ वरील चालक अल्लाउद्दीन इसाक शेख (वय २८ वर्ष, राहणार भिवंडी) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो भिवंडी ते महाबळेश्वर घेऊन जात असताना त्यास झोप आल्याने त्याच्या ताब्यातील टेम्पो पुणे लेन किमी १०: ८०० येथे पहिल्या लेनवर थांबवले. त्याच्या पाठीमागून आलेली इको स्पोर्ट कारवरील चालक मनीष आनंदा हरणे (वय ३० वर्ष, रा. विरार) हा पहिल्या लेन वरील पिक अप टेम्पोला पाठीमागून जोरदार ठोकर मारल्याने अपघात झाला.

## जिल्हा स्त्री रुग्णालयातील सोलार हीटरचे २६ ट्यूब लाईट फोडून साहित्य चोरी करणारा एक जेरबंद तर दुसरा फरार


**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयातील सोलार वॉटर हीटरचे २६ ट्यूब लाईट फोडून चोरी करणाऱ्या दोघां आरोपीपैकी एकाला कदीम पोलिसांनी जेरबंद केलय. तर दुसरा आरोपी पळून जाण्यास यशसवी झालाय. १४ जानेवारी रोजी रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या गच्चीवर पाणी गरम करण्यासाठी वापरण्यात येणारे सोलार वॉटर हीटर ट्यूब लाईट आणि साहित्य चोरीचा प्रयत्न झालाय. या वॉटर हीटरच्या पाईप मध्ये तांबा हा धातू असून या तांब्याची चोरी करण्यासाठी २ अज्ञात चोरटे जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या गच्चीवर गेले. होते. त्या दरम्यान दोन चोरट्यानी सोलार वॉटर हीटरचे २६ ट्यूब लाईट फोडले. एवढ्यावर न थांबता त्यातील साहित्य चोरण्याचा प्रयत्नात अचानक गस्तीवर असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील सुरक्षा रक्षकाचे लक्ष गेले. रुग्णालयाच्या गच्चीवर पाहणी करण्यासाठी असलेले सुरक्षा रक्षकाने २ चोरटे सोलार वॉटर हीटर मधील तांबा चोरी करत असल्याचा त्यांना आढळून आलय. त्याचं वेळी सुरक्षा रक्षक आणि चोरट्यामध्ये झटापट झालीय.

सुरक्षारक्षकाने एका चोरट्यास पकडले तर दुसरा चोरट्याने धूम ठोकली. तात्काळ सुरक्षा रक्षकाने हा सर्व प्रकार प्रशासनाला सांगितला. त्यानंतर त्यांनी ११२ नंबरवर फोन करून पोलिसांना कळवलय. घटनेची माहिती मिळताच कदिम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नागरे यांनी आपल्या कर्मचाऱ्यासोबत घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला असल्याची माहिती आज दिनांक १५ बुधवार रोजी दुपारी एक वाजता जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ एस.जी.गवारे यांनी दिली.



सुरक्षारक्षकाने पकडलेल्या एका चोरट्याला कदीम जालना पोलिसांच्या ताब्यात दिले.कदिम जालना पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या चोरी प्रकरणी अंदाजे चार लाखाचं नुकसान झाल्याचे जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ एस.जी.गवारे यांनी माहिती दिलीय.

## मोती बाग परिसरात झाडाला गळफास घेऊन एकाची आत्महत्या



**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या मोती बाग येथे झाडाला गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची घटना घडलीय. अहमद खान (रा. परतूर जि. जालना) असं मयत व्यक्तीचे नाव आहे. दोन बायका होत्या एक घर परतूरमध्ये आहे आणि दुसरा घर जालन्यातील गांधीनगर मध्ये असल्याची माहिती आहे.

अहमद खान यांनी मध्यरात्रीच्या सुमारास जालन्याच्या मोती बाग येथील एका झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना रात्री चंदंजिरा पोलीस पेट्रोलिंग करत असताना दोन वाजेच्या सुमारास निदर्शनात आली. पोलिसांनी घटनेची माहिती तात्काळ वरिष्ठांना दिली.

घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मयताला खाली उतरवून त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात पाठवला आहे. दरम्यान अहमद खान यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून या घटनेनं जालन्यात एकच खळबळ उडाली आहे.

## अंजना गंगासागरे यांना बहुजन समाज पार्टीतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**जालना । प्रतिनिधी -** अग्निशामक दलांचे अधिकारी सुरेश गंगासागरे यांची पत्नी अंजना सुरेश गंगासागरे यांचा आजारने दुखद निधन आज १४ जानेवारी सकाळी ८ वाजता झाल होता. याची अंतिम यात्रा दिनांक १५/०१/२०२५ आज सकाळी ११.३० वाजता राहत्या घरी मनीष अपार्टमेंट मोदीखाना तुन अमरधाम शेरी ला करणायत आली यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल सत्यनारायणजी करनाडे यानी. गंगासागरे परिवाला भेट देवून त्यांचा दुखात सहभागी होऊंन भावपूर्ण श्रद्धांजलि अर्पित करायात आली या वेळी दीपक डोगरे, भरतानंद भगत (पहलवान), विजय भगत, सुशील करनाडे, अनिल करनाडे, वाघमारे साहेब, मदन कुंडलकर, काशिनाथ जाटवे, कांता कुंडलकर , राम जी करनाडे , सत्यनारायणजी करनाडे, पवन सोनुने,सागर कुंडलकर, मुस्लिम भाईचारा अध्यक्ष इरफान बागवान , शेख इस्माईल संपूर्ण बहुजन समाज पार्टी आदरंजलि व्यक्त केली.

### पान १ वरुन

#### खड्डेमय रस्ते ...

गंभीर होत चालल्या आहेत. ही बाब विचारात घेता सर्व खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे.

शहरातील झोपडपट्टी धारकांना पीआर कार्ड देण्यात यावे, यांना शहरात रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी आवश्यक करण्यात आली आहे, ही आठ परत पालिकेच्या धर्तीवर रद्द करावी, छत्रपती संभाजीनगरप्रमाणे रमाई घरकुल आवास योजनेतील लाभार्थी रक्कम अडीच लाखावरून साडेतीन लाख करण्यात यावी, शहरात सिटी बस सेवा सुरू करावी, प्रत्येक वार्डात मोफत आरोग्य सेवा उभारणीसाठी क्लिनिक सुरू करावे आणि त्यांचे वेळ वाढविण्यात यावी, दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आलेला निधी शंभर टक्के वाटप करण्यात यावा, जलवाहिनीच्या गळतीमुळे होणाऱ्या रस्त्यांच्या दुरवस्थेला तातडीने थांबवावे, शहरातील स्वच्छतेसाठी सुसज्ज यंत्रणा उभी करून नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, सोयीस्कर वाहतुकीसाठी रस्त्यांची दुरुस्ती आणि व्यवस्थापन सुनिश्चित करावे, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत रस्ते आणि पायाभूत सुविधांची उभारणी त्वरीत करण्यात यावी, आदी मागण्या निवेदनात मांडण्यात आल्या असून, प्रशासनाने समस्यांवर तोडगा काढला नाही तर २३ जानेवारी रोजी उडान पुलावर रस्तारोको आंदोलन केले जाईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

#### सोशल मिडीया ...

मते, मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे मुलांना शिक्षणाबरोबरच या जाहिरातींचा अनावश्यक भडिमार सहन करावा लागत आहे. त्यामुळे बालमनावर नकारात्मक परिणाम होऊन गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. हे थांबवण्यासाठी आणि समाजाला एका सकारात्मक दिशेने नेण्यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या विषयाकडे प्रगत देश ज्या गांभीर्याने लक्ष देतात, तशीच दृष्टी आपल्या राज्यकर्त्यांनी ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच, मुलांच्या भविष्यासाठी व समाजातील नात्यांवरील विश्वास टिकवण्यासाठी या गोष्टींवर कडक कारवाई करावी, असा ठाम आग्रह त्यांनी धरला आहे.

#### लाडक्या बहिणीला ...

माजी प्रदेशाध्यक्ष योगिता खांडेभराड यांनी केला. आमच्या सगळ्या लाडक्या बहिणीला चॉकलेट दाखवण्याच काम या राज्यसरकारने केलंय. संक्रांतीपूर्वी २१०० रुपये खात्यात टाकू असं आश्वासन दिले होते मात्र तेही पूर्ण केले नाही. सरकारने निवडणुकी पुरता लाडक्या बहिणीचा वापर केला असल्याच आरोप करण्यात आलाय. सरकारने लाडक्या बहिणीची फसवणूक केली असून दिलेल्या शब्दाला त्यांनी जागाव असा सल्लाच महिलांनी दिलाय. तसेच येणाऱ्या काळात लाडक्या बहिणी काय असतात हे त्यांना दाखवून देण्याचा प्रयत्न करू असा इशारा देखील लाडक्या बहिणींनी दिलाय.

#### मराठा महासंघाचा ...

मागण्याचा इशारा मराठा महासंघाच्या वतीने देण्यात आलाय.यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख मराठा महासंघाचे कोषाध्यक्ष अशोक पडूळ मराठा महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष शैलेश देशमुख आदिंची उपस्थित होते.

## जालन्यात जमुनानगर भागात पिसाळलेल्या कुत्र्याचा माय-लेकीला चावा



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात पिसाळलेल्या कुत्र्याने माय लेकीला चावा घेतल्याची घटना घडलीय. या घटनेत मुलीच्या चेहऱ्याला तर आईच्या हाताला कुत्र चावल्याने गंभीर दुखापत झालीय. शीतल विंचाळ वय २४ वर्ष असं जखमी मुलीचं नावं आहे, तर पार्वती विंचाळ वय ४० वर्ष असं कुत्र्याने चावा घेतलेल्या जखमी आईचे नाव आहे. पार्वतीबाई आणि त्यांची मुलगी शीतल या दोन्ही माय लेकी जमुना नगर भागात रेशन दुकानात रेशन घेण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी रेशन घेऊन घरी जाण्यासाठी रिक्षाची वाट बघत असताना लांबून पळत आलेल्या पिसाळलेल्या कुत्र्याने दोघांनी चावा घेतला. या घटनेनंतर दोन्ही माय लेकीला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती ठीक आहे. दरम्यान, या घटनेमुळे जालना शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आलाय. शहरातील म ोकाट आणि भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी आता नागरिक करताय.

### सेवावस्तीतील महिला सोबत साजरी केली मकर संक्रांत

# वाण म्हणून दिले घरातील लोखंडी वापराचे साहित्य

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील विविध सेवा वस्त्यांमध्ये सावित्रीबाई फुले महिला एकात्म सम ाज मंडळाच्या वतीने मकर संक्रांतीचा सण साजरा करण्यात आला. यानिमि त्त समाज उपयोगी विविध उपक्रम राबवण्यात आले यामध्ये मकर संक्रातीनिमित्त संस्थेच्या वतीने शहरातील सेवा वस्तीत हळदी कुंकूवांचा कार्यक्रम आयोजन करून वाण म्हणून गृह उपयोगी लोखंडी कढई व तवे साहित्य दिले. मानवी शरीरामध्ये लोह कमी प्रमाणात होत आहे त्यामुळे जर्मल कमी वापरण्यात यावे ज्यामुळे आरोग्य व्यवस्थित राहील असे सपनाजी गोयल यांनी मत व्यक्त केले तसेच म कर संक्रात म्हणजे सामाजिक स्नेहभाव जपण्याचा उत्सव असून या दिवशी सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो ज्यामुळे शुभ आणि मांगलिक कार्याची सुरुवात होते हा दिवस उत्तरायणाची सुरुवात दर्शवतो. त्यामुळे हा महत्त्वाचा सण आहे असे त्या म्हणाल्या. आपल्या बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होत आहे. आपल्या घरात रोजच्या वापरात पूर्वीचे लोखंडी पितळ तांब्याच्या वस्तू कमी झाल्या आहे. लोखंडी तवा कढई व इतर साहित्य वापरल्यास



त्यातून आपल्याला आयर्न मि ळते जे की आपल्या निरोगी आरोग्यासाठी गरजेचे आहे. आरोग्य सेवेचे काम संस्था गेल्या चार वर्षापासून शहर आणि ग्रामीण भागामध्ये करत असून माणसाच्या सेवेसाठी सर्वतोपरी कार्य सावित्री फुले महिला एकात्म समाज मंडळ करत असून यामुळे सामाजिक सदभाव व समरसता पूर्ण सम ाज निर्मितीचे काम केले जात आहे असे मत भानुदास दोबाले यांनी व्यक्त केले. सामाजिक समरसतेच्या दृष्टिकोनातून संस्थेच्या वतीने सर्व वस्त्यांम ध्ये हा सण साजरा करण्यात येत आहे. यावेळी मधूलता भक्कड,सुनिता मालपाणी, डॉ. अमित हजारे,डॉ.दिनेश जोशी, मोनाली पंडित,दीक्षा कोळे,गोपाल गोमतीवाले,अमर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सरस्वती भुवन प्रशालामध्ये राज्य क्रीडा दिनाचे उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** शालेय शिक्षण व क्रीडा विभागाअंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने राज्य़ क्रीडा दिन आयोजन करण्यात आले आहे.यानिमि



त्ताने सरस्वती भुवन प्रशाला,जालना येथे ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म. दिन राज्य़ क्रीडा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

दि.१५ जानेवारी २०२५ रोजी स.भु.प्रशाला जालना येथे ऑलिपिंकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान व देशात शांतता राहावी यात युवकांची कर्तव्ये या विषयावर वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते तसेच महान कुस्तीपटु खाशाबा जाधव यांची जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दिलीपकुमार महाजन,प्रमुख अतिथी ड कांचन थोरवे, क्रीडाधिकारी डॉ. रेखा परदेशी, क्रीडाधिकारी आरती चिल्लारे, विजय गाडेकर, रमेश थोरवे ,उपमुख्याध्यापक दंडे, राहुल गायके यांची प्रमुख उपस्थिती होती.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यास क्रीडा शिक्षक हेमंत जोशी,किशोर नावकर, रमाकांत कुलकर्णी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सवडे यांनी केले.

जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे दुपारच्या सत्रात राज्य़ क्रीडा दिनानिमित्त. फुटबॉल स्पर्धा, तलवार बाजी स्पर्धा, टेनिक्काईट स्पर्धा, लोन-टेनिस स्पर्धा ओपन गट व रस्सीखेच स्पर्धा आयोजित करण्यात आले या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे , सुशिल तौर , राम पाटील देठे, गोविंद पाटील ढवळे, ईस्माईल शेख, अमोल काटकर, गणेश पैंजणे ,रोहण वाघमारे, पवन दांडगे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय तालिम संघ, जालना ,भारत शारीरिक शिक्षण महाविद्यालय, जालना येथे सायंकाळी राज्य क्रीडा दिना निमित्त कुस्तीच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या प्रसंगी डॉ. दयानंद भक्त, डॉ. शाम काबुलीवाल, चरण सले,डॉ. रेखा परदेशी, आरती चिल्लारे ,राहूल गायके, प्रदीप गायकवाड, डॉ. विनय आस्कंद, बी.यु शिंदे, हेमंत दायमाजी आदी उपस्थित होते.यावेळी विजयी पहिलवानांना पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे.

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा



**मंठा । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद महाविद्यालयात येथे १३ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तार वर्धापन दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रंसगी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर , स्वामी विवेकानंद , राजमाता मॉसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

तद्नंतर उपस्थितांना म ार्गदर्शन करताना लालबहादूर शास्त्री महाविद्यालय परतुर येथील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा दिलीप मनवर म्हणाले की, नामविस्तार नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलण्यापुरता मर्यादित स्वरूपाचा नव्हता तर तो सम ता, स्वातंत्र्य , बंधुभाव पुढे नेणारा लढा होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून साकारण्यात आलेला या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी आंबेडकरवादी अनुयायांना सतरा वर्ष संघर्ष करावा लागला प्रत्येक समाजातील घटकांनी (व्यक्तीने )एकत्र येऊन उभारलेला लढा म्हणजे नामांतराचा लढा अशी महत्त्वपूर्ण माहिती प्रमुख वक्ते . प्रा . दिलीप मनोहर यांनी दिली तर उपप्राचार्य प्राध्यापक संभाजी तिडके यांचेही प्रेरणादायी समायोजित भाषण झाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माणिकराव थिटे यांची उपस्थिती होती तर प्रम ुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ सुधाकर जाधव यांची विचार मंचावर उपस्थिती होती

कार्यक्रमांचे प्रस्थाविक प्रा. के.एम कांबळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ . सुभाष वाघमारे यांनी केले कार्यक्रमात तर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. राजेश गायकवाड , प्रा. के . एम कांबळे , प्रा.डॉ. तुषार धोंडगे प्रा.डॉ संतोष वानखडे , प्रा.डॉ. दक्षता देशमुख कार्यालयीन अधिक्षक श्री दत्तात्रय कडूकर ,मुख्य लिपीक अशोक मुळे व म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रम ाच्या समारोप प्रसंगी प्रा. डॉ राजेंद्र काकडे यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले.

## कुंभेफळ येथे जखमी अवस्थेत आढळलेल्या काळवीटचा मृत्यू



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात जखमी अवस्थेत आढळलेल्या काळवीटचा अखेर मृत्यू झालाय. जालना तालुक्यातील कुंभेफळ येथे १० ते १५ कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात एक काळवीट गंभीर जखमी झाला होता. ही गोष्ट कुंभेफळ येथील नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी याची माहिती वनविभागाला दीली. पण वनविभागाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी आला नसल्याने परिसरातील नागरिकांनी याची माहिती शेख आवेज शेख युनूस या सर्पमित्रांला दिली. प्राणी मित्रांनी त्या जखमी काळवीटाला पशू वैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले. म ात्र, डॉक्टरांनी काळवीटला तपासून मृत घोषित केले. त्यांनतर शेख आवेज शेख युनूस या प्राणी मित्रांनी याची माहिती वन विभागाला दिली. माहितीवरून वन विभागाचे अधिकाऱ्यांनी शेख आवेज शेख युनूस या सर्पमित्रांला सांगून सिंदखेड राजा रोडवर असलेल्या वनविभागात अणण्याचा सल्ला दिलाय. वनविभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वविच्छेदन न करता दफनविधी केल्याची प्राथमिक माहिती समोरं आलीय. अंदाजे २ ते अडीच फुटाचा खड्डा खोदुन दफनविधी केलाय. मृत काळवीट ला वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पुरून टाकले. दरम्यान, जालन्यात झालेल्या काळवीटच्या दुर्दैवी मृत्यू मुळे एकच हळहळ व्यक्त केली जातेय. दरम्यान, कल्वियच्या मृत्यूला वन विभाग जबाबदार असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केलाय. कुंबेफळ येथील नागरिकांनी काळवीट जखमी असण्याची माहिती वन विभागाच्या पथकाला दिली. मात्र, वनविभागाने कुंबेफळ येथे न येता तुम्हीच जखमी काळवीट आमच्याकडे आणा असं सांगितलं. जर, वनविभागाचे अधिकारी कर्मचारी कुंबे फळ येथे आले असते तर कदाचित काळवीटचा जीव वाचला असता. मात्र, वन विभागाच्या बेजबाबदारपणामुळे एका निष्पाप जनावराचा आज दुर्दैवी मृत्यू झालाय. यामुळे वनविभागावर प्रश्न चिन्ह उपस्थित होतो..

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आवाहन

**जालना -** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनअंतर्गत परतूर, मंठा आणि जालना तालुक्यातील १७३/९५/१२० गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाणी वितरणासाठी तीन तालुक्यात विविध पाईपलाईनची काम पूर्ण करण्यात आली आहेत. सध्या पाईपलाईनद्वारे परतूर, मंठा आणि जालना तालुक्यातील २६८ गावांना जलकुंभाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तरी विविध विभागामार्फत कामे करतांनी पाईपलाईनची तुट-फुट होवून या गावांना पाण्यापासून वंचित रहावे लागते तसेच ग्राम स्थांच्या रोषाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सामोरे जावे लागते.

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार वर्धापन दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

**मंठा । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद महाविद्यालयात येथे १४ जानेवारी २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तार वर्धापन दिना निमित्त

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले .नामविस्तार वर्धापन दिना निमित्त महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व नमांतर लढ्याचा इतिहास या विषयावर निबंध स्पधेचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ. माणिकराव थिटे यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य प्रा डॉ सुधाकर जाधव, उपप्राचार्य प्रा.डॉ. सदाशिव कमळकर , उपप्राचार्य प्रा संभाजी तिडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रा डॉ. डि व्ही गिरि, प्रा डॉ. किसनसिंग गहिलोद , प्रा एकनाथ आघाव , प्रा. रमेश मोरे, प्रा.रमेश शिंदे , प्रा संतोष रंजवे , प्रा माणिक सोळंके , प्रा. पी.बी कुलकर्णी , प्रा नारायण खरात , प्रा टि. एम खरात , प्रा नारायण दूभळकर आदिंचीउपस्चित होती.

कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी संस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. राजेश गायकवाड ,कार्यालयीन




अधिक्षक श्री दत्तात्रय कडूकर ,मुख्य लिपीक श्री अशोक मुळे श्री आशोक काळे ,श्री काकडे , श्री सदाशिव आकात , श्री उध्वव भूतेकर श्री गोविंद खवल ,,श्री गणेश घनवट व म हाविद्यालयीन विद्यार्थी शुभम उबाळे, पृथ्वीराज बोराडे , बाळू चाळक , जिवन गोरे , योगेश वाघमारे, प्रसाद ढाले आर्दीनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला लोकशाही दिनाचे २० जानेवारीला आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोम वारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तरी सोम वार दि. २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीमध्ये महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे दाखल करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही.

महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे म हिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय म हिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनात अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लवकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सृष्टी फाउंडेशनच्या अध्यक्षपदी संजीवनी देशपांडे तर सचिवपदी जयश्री कुंजके यांची निवड



**जालना । प्रतिनिधी -** नुकतीच सृष्टी फाउंडेशनची वार्षिक सभा संपन्न होऊन यात सृष्टी फाऊंडेशन नुतन अध्यक्ष म्हणुन सौ. संजीवनी देशपांडे, सचिव पदी जयश्री कुंजगे तर कोषाध्यक्ष पदी वृषाली नानावटी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या पदग्रहण समारंभास सामाजिक कार्यकर्ते दिलीप देशपांडे,माजी अध्यक्षा श्रीमती विद्या पाटील,सचिव मंजुषा क्षीरसागर, प्रतिभा श्रीपत, संध्या जहागीरदार,शारदा व्यवहारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्या पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला तर संजय देशपांडे यांनी फाउंडेशन मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

शहरात फाउंडेशनच्या वतीने राबवत असलेले उपक्रम भविष्यात अजुन मोठया प्रमाणात राबविले तर जातीलच, शिवाय पर्यावरणाच्या दृष्टीने पुरक असे विविध नाविण्यपूर्व उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील असे नुतन अध्यक्ष सौ. संजीवनी देशपांडे यांनी सांगितले. सृष्टी फाउंडेशनचे काम अतिशय स्तुत्य असुन आमचे नेहमीच सहकार्य फाउंडेशनला राहील असे प्रमुख अतिथी दिलीप देशपांडे यांनी सांगितले.

फाउंडेशन मध्ये नव्याने सभासद झालेल्या सभासदांचे यावेळी फाउंडेशनच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. प्रतिभा श्रीपत यांना सांगली येथे नुकताच सवित्रीबाई फ ुले यांच्या नावाने दिला जाणारा राज्य स्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल फाउंडेशन च्या वतीने श्रीपत यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संध्या जहागीरदार, सूत्रसंचलन प्रतिभा श्रीपत यांनी केले तर नुतन जयश्री कुंजगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम ास संगीता मूळे, वर्षा जयरंगे, रचना बक्षी, आशा भाले,प्रा. पवन देशमुख, प्रविण पवार, सरोज जाधव,उषा जोशी, दीपाली कुलकर्णी, सुनीता भंडे, अंजना सुरडकर, सुनीता आष्टीकर, राजश्री मुरगे, अनंत वाघमारे आदि उपस्थित होते.

# पांदन रस्त्याचे काम न करताच उचलले दाम

## तहसीलदार व सा.बां. विभागाचे उपअभियंत्याकडे तक्रार

**मंठा । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी राज्य शासनाकडून शेतकरी हिताच्या नवनवीन योजना राबविल्या जातात. त्यातूनच तत्कालीन राज्य शासनाने शेतकरी मातोश्री पांदण रस्ता योजना अंमलात आणली. शेतात पिकविलेला माल बाजारात ने-आण करण्यासाठी, यांत्रिक साधने थेट शेतकऱ्याच्या शेतात जावी, यासाठी मातोश्री पांदण रस्ता योजना महत्त्वाची आहे. मात्र प्रशासनाचा दुर्लक्ष कामचुकारपणामुळे संधीत यंत्रणा रसत्याचे काम न करताच काही थातूरम ातुर करून सध्याच्या शासनकर्त्यांवर भारी पडत असून या योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या तालुक्यात दिसत आहे. त्यामुळे ही योजना तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिवास्वप्नच ठरत असून शेतकऱ्यांमध्ये सदर योजनेबाबत संभ्रमावस्था आहे.अशीच स्थिती केहाळ वडगाव शिवारात सा. बां. विभागाचे शाखा अभियंता यांच्या दुर्लक्षामुळे मातोश्री पांदन रस्त्याचे काम न करतां त्याचा म ोबदला उचलल्याची तक्रार तहसीलदार व उपाभियंता सा. बा. विभाग यांच्याकडे केली आहे. तक्रारदाराचे म्हनणे आहे की, मौजे केहाळवडगाव येथील श्री देविदास राठोड यांचे शेत मौजे तळेगाव शिवापर्यंत मातोश्री पांदन रस्त्याचे काम एकूण २. कि.मी चे काम असून त्याचे त्याच्यावर एक टोपले मातीही न टाकता नुस्ते फोटो काढून एका किलोमिटरचे अंदाजे चार लाख रुपयेव तसेच भाग दोनचे अंदाजे एक लाख चाळीस हजार रक्कम मस्टर द्वारे उचली आहे. तरी आपण सदरील ठिकाणी येऊन कामाची पाहणी करून व संबधितावर कामाची चौकशी करून कारवाही करावी सदरील काम मोजमाप पुस्तिकेनुसार करण्यात यावे हि अशी मागणी हरिभाऊ दवणे व दीपक दवणे यांनी केली आहे









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.